MHKO050013782018

अंतिम हुकूमनामा अर्ज क्रं.६/ २०१८, नि. १७

**बाळ अबुबकर मुल्ला–मुल्लाणी**
**विरुध्द**
**श्रीमती खातूनबी बाबासो मुल्ला–मुल्लाणी वगैरे**

## निशाणी क्रं.१७ वरील आदेश

(दि.१६/०३/२०२२)

प्रस्तुतचा अर्ज आदेश १ नियम १० प्रमाणे थर्ड पार्टी म्हणून सामील करणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदारांनी कथन केले की, मुळ दरखास्तदार याचे आजोबा दादु मुल्लानी यांची मुलगी जहीराबी यांचे अर्जदार ही मुले असून त्यांचा आजोबांचा मिळकतीमध्ये हक्क असल्याने त्यांना डावलून चुकीचा दावा दाखल करुन हुकूमनामा मिळविलेला आहे. सबब, त्यांना प्रकरणामध्ये अत्यावश्यक पक्षकार म्हणून सामील करुन घ्यावे. नि.२२ वर मुळ दरखास्तदार यांनी जबाब दाखल करुन अर्जदारांना सकृत दर्शनी कोणताही हक्क नसलेने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली. दोन्ही पक्षांतर्फे युक्तीवाद ऐकला.

३. मुस्लीम कायद्यात, हिंदू कायद्याप्रमाणे वारसा हक्काने मिळकतीमध्ये हक्क प्राप्त होत नाहीत. केवळ उत्तरजिवीत व्यक्तींनाच हक्क प्राप्त होतो. प्रकरणातील मुळ पुरुष दादू मुल्लानी याचे हयातीत त्यांचा एकमेव मुलगा अबू बकार मुल्लानी मयत झाला. त्यामुळे अबू बकार मुल्लानीच्या मुलांना अथवा वारसांना त्याचे मिळकती कोणताही हक्क प्राप्त होत नाहीत. मुळ पुरुष दादू मुल्लानी याने त्याच्या हयातीत अबू बकार मुल्लानीचे मुलगे बाळ अबू बकार मुल्लानी व बाबासाहेब अबू बकार मुल्लानी यांना रजिस्टर दस्ताने बक्षीसपत्राने संपूर्ण मिळकत हस्तांतरीत केली. त्यामुळे ते दोघेही सदर मिळकतीचे एकमात्र मालक होतात. अबू बकार मुल्लानीच्या मुली अथवा मुलांना वारसा हक्काने कोणत्याही मिळकतीत हक्क प्राप्त झाला नसल्याने अर्जदारांची आई व अर्जदार यांना देखील कोणताच हक्क मिळत नाही. सबब, अर्जदार सदर प्रकरणात अत्यावश्यक अथवा जरुरीचे पक्षकार होत नाहीत. अंतिम दरखास्तीमध्ये शेत मिळकत कलम ५४ अन्वये जिल्हाधिकारी यांचेकडे वाटपासाठी पाठविण्याकरिता हा अर्ज दाखल केलेला आहे. मुळ दाव्यात प्रस्तुत अर्जदारांचे हक्क निश्चित केलेले आहेत. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

SAPNA ARUN HARNE Digitally signed by SAPNA ARUN HARNE Date: 2022.03.16 18:02:14 +0530

दि.१६/०३/२०२२ (एस.ए.हरणे)

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.